ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I(b) Jan – Feb, 2025

OPEN ACCESS

Original Research Article

भारतातील दारिद्र्य : अन्न,दारिद्र्य आणि आरोग्य,शैक्षणिक उपलब्धी (कौशल्य) व राहणीमान

** प्रा. डॉ. रमेश भालेराव आणि ** संदीप दौलतगिर गिरी*

**प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शारदा महाविद्यालय, परभणी.*

*** ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी.*

प्रस्तावना:

आज जगाची लोकसंख्या 6.5 अब्ज पेक्षा अधिक झाली असून यामध्ये भारतीय लोकसंख्येचा वाटा 1.40 अब्ज पेक्षा अधिक आहे. लोकसंख्येच्या क्रमवारीमध्ये भारताने चीनला मागे सोडत पहिला क्रमांक मिळविला आहे.लोकसंख्येची ही झाली एक बाजू तर दुसरी बाजू लक्षात घेतली तर आपल्या असे निदर्शनास येते की, वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक समस्यांची निर्मिती होते.जसे कीअन्न,आरोग्य, राहणीमान, वृद्धांच्या समस्या,जागेची समस्या,पाण्याची समस्या इत्यादी.अशा प्रकारच्या समस्या निर्माण होऊन लोकांच्या जगण्याचा प्रश्न निर्माण तर होतोच परंतु समाजातील अनेक लोकांना अशा समस्या नाही सोडविता आल्या किंवा लोकांच्या असणाऱ्या मूलभूत गरजा जर नाही भागविता आल्या तर समाजामध्ये दारिद्र्य निर्माण होण्याची भीती असते.जेंव्हा दारिद्र्य ही समस्या कमी प्रमाणावर किंवा कमी लोकपर्यंत सीमित असते तेव्हापर्यंत तिचे दुष्परिणाम जाणवत नाहीत. परंतु दारिद्र्यामुळे समाजातील लोकसंख्येचा मोठा भाग प्रभावित होत असेल तर ती एक बिकट आणि भीषण सामाजिक समस्या आव्हान स्वरूपात आपल्यासमोर येते.

Copyright © 2025 The Author(s): This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

दारिद्र्य -अर्थ :

"जीवनाच्या किमान मूलभूत गरजा ज्यामध्ये अन्न, वस्त्र, निवारा,आरोग्य आणि शिक्षण इत्यादी न भागविता येण्याची परिस्थिती म्हणजे दारिद्र्य (Poverty)होय."

जेव्हा समाजातील एक मोठा गट जीवनाच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी अपयशी ठरतो तेव्हा निर्माण होणाऱ्या अशा परिस्थितीला 'जन दारिद्र्य'(Mass Poverty)असे म्हणतात.अशा परिस्थितीमध्ये दारिद्र्य ही एक भीषण सामाजिक समस्या बनते.

संशोधन पद्धती :

"भारतातील दारिद्र्य : अन्न,दारिद्र्य आणि आरोग्य,शैक्षणिक उपलब्ध (कौशल्य) व राहणीमान" या विषयावर संशोधन करण्यासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला असून तथ्य संकलनासाठी दुय्यम साधनसामग्रीचा आधार घेतला आहे.यामध्ये NSSO (National sample survey Office) चा वार्षिक अहवाल,नियतकालिके,संदर्भ ग्रंथ व इंटरनेट (आंतरजाल) यांच्या साह्याने माहिती मिळविली आहे.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I(b) Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

संशोधन समस्या :

भारतीय अर्थव्यवस्था ही जगात सगळ्यात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे.येत्या काही वर्षात आपण पाच ट्रिलियन इथपर्यंत आपली अर्थव्यवस्था पोहोचलेली असेल अशा ही काही घोषणा केल्या जात असल्याचे आपल्या निदर्शनास आले आहे. मग इतके सगळे होत असतानाही एकूण 140 कोटी लोकसंख्येपैकी 80 कोटी लोकांना मोफत धान्य का वाटावे लागत असेल ? दिवसेंदिवस दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण का वाढत चालले आहे ? मोजक्याच लोकांची आर्थिक भरभराट का होत आहे ?लोकसंख्येचा खूप मोठा भाग दैनंदिन गरजा ही पूर्ण करू शकत नाही. इतका उत्पन्नाचा स्तर त्यांचा कमी का झाला आहे ? त्याची नेमकी कारणे कोणती ? सुशिक्षित बेरोजगारांची समस्या का वाढत आहे? कोरोना महामारीच्या काळात तर माणसे नाहक मारली गेली. परंतु यानंतरच्या काळातही अनेक लोक केवळ औषधे व डॉक्टरांच्या उपचारांच्या अभावामुळे तडफडून मेलेली आपण पाहिली आहेत. या सर्वांच्या पाठीमागील नेमकी कोणकोणती कारणे आहेत ? हे सर्व जाणून घेण्यासाठी सदरील समस्या संशोधनासाठी घेतली आहे.

संशोधन कालावधी,व्याप्ती व मर्यादा :

"भारतातील दारिद्र्य : अन्न,दारिद्र्य आणि आरोग्य,शैक्षणिक उपलब्धी (कौशल्य) व राहणीमान" या विषयावर संशोधन करण्यासाठी संशोधन कालावधी इ. स. 1960 ते इ. स. 2023 हा घेतला असून संशोधन विषयाची व्याप्ती "भारतातील दारिद्र्य : अन्न, दारिद्र्य आणि आरोग्य,शैक्षणिक उपलब्धी (कौशल्य) व राहणीमान" पर्यंत मर्यादित आहे.सदरील संशोधन पूर्ण करण्याकरिता लागणाऱ्या माहिती संकलनासाठी दुय्यम साधनसामग्रीचा आधार घेतला आहे.

मुख्य माहिती :

जगात सर्वात मोठी लोकशाही असणारा देश म्हणून भारताची ओळख आहे.अनेक भौगोलिक वैशिष्ट्यांसह वेशभूषा,परंपरा,नैसर्गिक साधनांची उपलब्धता भारतामध्ये आहे.एवढे सर्व असूनही आज भारत देश विकसित देशांच्या यादीमध्ये नाही हा सगळ्यात मोठा विरोधाभास आपल्या निदर्शनास येतो.याचे सगळ्यात महत्त्वाचे कारण आपल्याला सांगता येईल ते म्हणजे भारतामध्ये असणारे दारिद्र्य.भारतामध्ये दारिद्र्य का आहे ?दारिद्र्य दिवसेंदिवस का वाढत आहे ? याची काही कारणे आपल्यासमोर येतात. ती कारणे खालील प्रमाणे मांडता येतील.

1) दरदोई उत्पन्न कमी असणे.

2) ज्यादा लोकसंख्या.

3)वाढती बेकारी.

4) आर्थिक असमानता.

5) साक्षरतेचे प्रमाण कमी असणे.

6)हरितक्रांतीचा फायदा कोरडवाहू शेतकऱ्यापर्यंत न पोहोचणे.

7) नवीन आर्थिक धोरण.

8) विकासाचा वेग कमी असणे.

9)वाढती महागाई.

10)शेतजमिनीचे असमान वाटप.

11)शेतीची उत्पादकता कमी असणे.

12) दारिद्र्य निर्मूलनाचे अपुरे प्रयत्न.

ISSN-2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Issues– I(b) Jan – Feb, 2025
OPEN ACCESS Original Research Article

13)भ्रष्टाचार.

वरील सर्व कारणे आपल्या दारिद्र्य निर्मितीसाठी सांगता येतील आता हे दारिद्र्य कसे मोजले जाते ते आपण पाहू या.

भारतातील दारिद्र्य मोजमाप : दारिद्र्य रेषा

भारतात दारिद्र्याचे प्रमाण (Poverty Ratio) मोजण्यासाठी दारिद्र्य रेषा(Poverty Line) या संकल्पनेचा वापर केला जातो .दारिद्र्य रेषा 'उपभोग खर्चा' च्या (Consumption Expenditure)आधारावर ठरविली जाते .दारिद्र्य रेषा ठरविण्यासाठी एका व्यक्ती मागे एका महिन्यात च्या उपभोग खर्चाचा एक न्यून स्तर निश्चित केला जातो. त्याला 'मासिक प्रति व्यक्ती उपभोग खर्च'(Monthly Per Capita Consumption Expenditure : MPCE) म्हणून संबोधले जाते. या न्यून स्तरापेक्षा ही कमी उपभोग खर्च करणाऱ्या व्यक्तीला 'गरीब'किंवा 'दारिद्र्य रेषेखालील' व्यक्ती किंवा कुटुंब (Below Poverty Line : BPL) असे संबोधले जाते. तर त्यापेक्षा अधिक खर्च करणाऱ्या व्यक्ती किंवा कुटुंबांना 'दारिद्र्यरेषेवरील कुटुंब' (Above Poverty Line : APL) म्हणून संबोधले जाते.दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येच्या एकूण लोकसंख्येतील प्रमाणाला 'दारिद्र्य प्रमाण' (Poverty Ratio) किंवा 'Head - Count Ratio' असे संबोधले जाते.

दारिद्र्याचे निर्देशांक : Indicators Of Poverty

दारिद्र्याचे खालील निर्देशांक आपल्या निदर्शनास येतात.

1) उपासमार :-

2) उत्पन्न दारिद्र्य :-

3) बहुआयामी दारिद्र्य :-

भारतातील दारिद्र्य रेषेच्या मोजमापासाठी नियोजन मंडळ नोडल एजन्सी म्हणून कार्य करते. नियोजन मंडळाने वेळोवेळी कार्यगट स्थापन करून त्यांच्यावर दारिद्र्य रेषा व प्रमाण मोजण्यासाठी पद्धत शोधून काढण्याची जबाबदारी सोपविली. हे कार्य गट पुढीलप्रमाणे .

1)धनंजयराव गाडगीळ कार्यगट ,1962

2)अलग कार्यगट ,1979

3)लाकडावाला तज्ञ गट , 1993

4)सुरेश तेंडुलकर तज्ञ गट , 2005

5)सी.रंगराजन पॅनल , 2012

6)पनगडिया कृती दल , 2015

दारिद्र्य निर्मूलनासाठी धोरणे व कार्यक्रम :

(Policies and programs towards poverty alleviation) भारताच्या घटनेत तसेच पंचवार्षिक योजनांमध्ये सामाजिक न्याय हे सरकारच्या विकास धोरणांचे प्राथमिक उद्दिष्ट असल्याचे सांगण्यात आले आहे. बहुतेक सर्व धोरणांमध्ये दारिद्र्य निर्मूलनावर भर देण्यात आलेला आहे व त्या अनुषंगाने सरकारने विविध डावपेचांचा स्वीकार केलेला आहे. दारिद्र्य निर्मूलनासाठी सरकारने त्रीआयामी दृष्टिकोनाचा स्वीकार केलेला आहे.

1) वृध्दीधारित दृष्टिकोन.(Growth Oriented Approach)

2) दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम.(Poverty Alleviation program)

3) किमान मूलभूत सुविधांची तरतूद.(Provision Of Minimum Basic Amenities)

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I(b) Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

निष्कर्ष : सामाजिक न्याय व समता हे भारताच्या घटनेत आहे.सरकारच्या सर्व प्रकारच्या योजनांचे,धोरणांचे आणि कार्यक्रमांचे प्राथमिक उद्दिष्ट हे दारिद्र्य निर्मूलन असते.तरीही भारतातील दारिद्र्याची ही समस्या दिवसेंदिवस उग्र स्वरूपात आपल्यासमोर नवीन सामाजिक समस्या म्हणून उभी राहिली आहे.

संदर्भ :

1) Ahuja H.L. – Macroeconomics- S Chand, 20th Edition.

2) डॉ. देसले किरण जी, स्पर्धा परीक्षा अर्थशास्त्र -, दीपस्तंभ प्रकाशन जळगाव.

3) Dutta And Sundaram - Indian Economy.

4) कोळंबे रंजन,भारतीय अर्थव्यवस्था - भगीरथ प्रकाशन पुणे.

5) डॉ. पाटील आनंद , MPSC - CSAT परीक्षा संपूर्ण मार्गदर्शक

6.) Singh Ramesh Indian Economy 14th Edition 2022-2023

7)https://www.google.com/url?sa=t&source=web&rct=j&opi=89978449&url=https://pib.gov.in/PressReleaseIframePage.aspx%3FPRID%3D1996271&ved=2ahUKEwjkrpqIlfuEAxX7w6ACHRKECpUQFnoECBMQBQ&usg=AOvVaw1t5Sw6VRQemOzx9OmU7iHG.

8) Asian Development Bank, https://www.adb.org Understanding Poverty in India.

9) The Economic Times https://m.economictimes.com › ... India's poverty rate declined to 4.5-5% in 2022-23: SBI Research.

Cite This Article:

प्रा. डॉ. भालेराव र. आणि गिरी सं दौ. *(2025). भारतातील दारिद्र्य : अन्न,दारिद्र्य आणि आरोग्य,शैक्षणिक उपलब्धी (कौशल्य) व राहणीमान.* **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: Vol. XIV (Number I, pp. 66–69)

Doi: https://doi.org/10.5281/zenodo.16486433